# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १८ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने परीक्षेबाबत अधिक जनजागृती व्हावी व कॉपीचे समूळ उच्चाटन व्हावे यासाठी विद्यापीठ करीत असलेल्या प्रयत्नांना महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांनी सहकार्य करावे अशी अपेक्षा प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे यांनी बुधवार दि. १८ ऑक्टोबर रोजी महाविद्यालये व विद्यापीठातील परीक्षा संदर्भातील कामकाज करणारे अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित मार्गदर्शन सभेत व्यक्त केली.

यावेळी मंचावर कुलसचिव डॉ. विनोद पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा.योगेश पाटील हे होते. प्र-कुलगुरू प्रा. इंगळे म्हणाले की, विद्यापीठाच्या परीक्षा पध्दतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून परीक्षा निकाल ३० ते ४५ दिवसाच्या आत जाहीर करण्याची परंपरा आपल्या सर्वांच्या सहकार्याने होत आहे. इतर विद्यापीठे, या विद्यापीठाची अद्ययावत परीक्षा प्रणाली पाहण्यासाठी येत असतात. तणावमुक्त व कॉपीमुक्त परीक्षा करण्यासाठी विद्यापीठ करीत असलेल्या प्रयत्नांना व या संकल्प अभियानास महाविद्यालयांची साथ मिळाल्यास नक्कीच यश प्राप्त होईल. महाविद्यालयीन कर्मचारी व विद्यापीठ कर्मचारी यांच्यात नेहमी समन्वयाने कामकाज व्हावे जेणेकरून विद्यार्थ्यांना अडचणी येणार नाहीत असे आवाहन केले.

कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी महाविद्यालय व विद्यापीठ यांच्यात नेहमी सुसंवाद रहावा यासाठी ही कार्यशाळा घेण्यात येत आहे. तसेच यापुढे जिल्हानिहाय देखील या कार्यशाळांचा आयोजन करण्यात येत आहे. प्रा. योगेश पाटील यांनी परीक्षा विभागाची कार्यपध्दतीची तसेच परीक्षा कामकाज करतांना विद्यापीठाने सॉफ्टवेअर मध्ये केलेल्या सुधारणांची माहिती दिली. विद्यार्थ्यांचे प्रश्न महाविद्यालय स्तरावर सोडविले जावेत यासाठी प्रयत्न करावे. तसेच कॉपीचे समूळ उच्चाटन व्हावे याकरीता महाविद्यालयात जागोजागी जनजागृतीचे पोस्टर, शिक्षेसंदर्भातील माहिती, पथनाट्य आदी माध्यमातून प्रयत्न व्हावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. डॉ. नरसिंह परदेशी यांनी कॉपीकेस संदर्भातील फॉर्मची माहिती विशद केली. ई-सुविधा पोर्टल बाबतची माहिती एम.के.सी.एल.चे अजित शिंदे व अमोल पाटील यांनी दिली.

या बैठकीत झालेल्या खुल्या चर्चेत महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांनी ज्या महाविद्यालयात विद्यार्थी संख्या जास्त असेल तेथे वरीष्ठ पर्यवेक्षकांची संख्या वाढवावी, प्रवेश पत्र ऑनलाईन दुरूस्त व्हावे, परीक्षेचे सेशन्स कमी व्हावेत, संगणकीय प्रणालीसाठी तांत्रिक सहायकाची नेमणूक व्हावी, कॉपीकेस विद्यार्थ्यांचे फॉर्मची संख्या कमी व्हावी यासारख्या विविध मागण्या केल्या. या प्रश्नांची उत्तरे कुलसचिव, संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ व प्राचार्य यांनी दिली. या बैठकीत प्राचार्य एम.व्ही. पाटील व महाविद्यालयातील परीक्षा विभागाचे कामकाज करणारे कर्मचारी तसेच विद्यापीठातील परीक्षा विभागात काम करणारे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रवीण चंदनकर यांनी मानले.

**बातमी नं. २**

जळगाव दि. १८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्ष आणि पर्यावरण व भूशास्त्र प्रशाळा यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १७ ऑक्टोबर रोजी 'वायुमंडलीय विज्ञान आणि पृथ्वी' या विषयातील संबधित करिअर मार्गदर्शन व्याख्यान आयोजित करण्यात आले.

यावेळी भारतीय उष्णदेशीय मौसम विज्ञान संस्था, पुणे येथील शास्त्रज्ञ डॉ. मेधा देशपांडे या प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होत्या. व्याख्यानाचे उद्घाटन पर्यावरण व भूशास्त्र प्रशाळा संचालक डॉ. संजयकुमार थोरात यांच्या

हस्ते झाले. डॉ. देशपांडे यांनी भावनिक बुध्दिमत्ता, संभाषण कौशल्य, संशोधन पध्दती, निर्णय क्षमता, वेळेचे नियोजन, पर्यावरणीय आणि वायुमंडलीय विषयातील संशोधन आणि रोजगाराच्या संधी या विषयी मार्गदर्शन केले. तसेच केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाचे समन्वयक तथा भूविज्ञान विभागप्रमुख डॉ. एस. एन. पाटील यांनी विद्यापीठातर्फे आयोजित करण्यात आलेल्या विविध इंटर्नशिप संधी, परिसर मुलाखती याबद्दल मार्गदर्शन केले. तर डॉ. के. पी. दांडगे यांनी प्रास्ताविक व आभार मानले. यावेळी विद्यार्थ्यांचे शंकाचे निरसन करून प्रबोधन करण्यात आले. यावेळी प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा, प्लेसमेंट कक्षाचे समन्वयक प्रा. रमेश सरदार, पर्यावरण व भूशास्त्र प्रशाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, संशोधक विद्यार्थी आणि प्रशाळेतील विद्यार्थ्यांनी व्याख्यानाच्या आयोजनासाठी परिश्रम घेतले.

**बातमी नं. ३**

जळगाव दि. १८ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राच्या हिंदी विभागामार्फत हिंदी दिवसाच्या निमित्ताने 'राष्ट्रीय शिक्षा निती-२०२० के लाभ, चुनौतीया एवंम संभावनाये' या विषयावर राष्ट्रीयस्तरावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेसाठी देशातील विविध विद्यापीठांमधून स्पर्धक सहभागी झाले होते. या निबंध स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांची पारदर्शकता पाळण्यात येवून निवड समितीने तीन विजेते घोषित केले. त्यांची घोषणा प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे यांनी केली. त्यात पहिले पारितोषिक कु. पुजा देवी (इंदिरा गांधी राष्ट्रीय जनजातीय विद्यापीठ, अमरकंटक, मध्यप्रदेश), दुसरे पारितोषिक हे सचिन कुमार ( बाबासाहेब भिमराव आंबेडकर विद्यापीठ, लखनौ, उत्तर प्रदेश) तर तिसरे पारितोषिक राजरत्न अशोक तायडे (कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बोदवड, जि. जळगाव महाराष्ट्र) यांना देण्यात आले. या स्पर्धेसाठी भाषा प्रशाळेच्या संचालिका प्रा. मुक्ता महाजन यांनी मार्गदर्शन केले. या स्पर्धेसाठी डॉ. प्रिती सोनी यांनी आयोजन केले होते. यावेळी डॉ.पुरुषोत्तम पाटील, भरत पालोदकर व दिपक बागुल यांनी सहकार्य केले.

.................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: १८ ऑक्टोबर, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता